(35)

Adv. Yatin V. Gujrathi

Mob: 9869519026
9320519026

(खडकपाडा पोलिस स्टेशन)

R. 240/2019 U/S 156(3)

O M A
360
2017

अर्ज क्रमांक :- 795/19
अर्ज दाखल तारीख :- 4/4/19
दस्तऐवज आलेली तारीख :-
नक्कल बघार तारीख :-
नक्कल सुपूर्द तारीख :- = 5 APR 2019
नक्कल स्विकारणार :- Advocate

एकूण पान :- 11
दर प्रति पान :- 7
एकूण नक्कल फी :-

सहा.सत्र अधिक्षक
पहिले न्यायालय, कल्याण

= 5 APR 2019

दाखल मानक 27 JUL 2017

कल्याण यथाल प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी पहिले न्यायालय, कल्याण

यांचे न्यायालयात

चौकशी अर्ज कमांक ३८८ / २०१७

(खडकपाडा पोलीस स्टेशन)

श्री रितेश विरेंद्र मिश्रा,
वय३५ वर्षे, धंदा व्यवसाय,
भागीदार, मे एसेट रिॲलिटी,
२, संघवी एस्टेट, आरटीओ रोड,
सिनेमॅक्स जवळ, कल्याण (प)

perused application verification statement of the applicant & Report u/s. 202 of Cr.P.C. & prima facie appears that the ingredients of s. 420, 406 are applicable फिर्यादी to present scenario. However, ingredients of s. 384 & 506(2) are not applicable. Hence, issue process against accused u/s. 420, 406 r/w 34 I.P.C. & be registered as warrant case.

25.3.19

Put up for argument

2-8-17

विरुध्द

(१) श्री. पंकज जटाशंकर त्रिवेदी, वयस्क वय. 37 वर्षे
(२) सौ निरूपमा पंकज त्रिवेदी, वयस्क वय.32
दोघे राहणार ई - १ / ४०६, पुण्योदय पार्क,
आधारवाडी, डॉन बास्को शाळेजवळ,
कल्याण (प) जि ठाणे

सामनेवाले

भारतीय दंड विधान कलम ४२०, ४०६, ३८४, ~~४०६~~, ५०६ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करणे कामी तक्रार अर्ज फौजदारी प्रक्रीया संहीता कलम १५६ (३) प्रमाणे

फिर्यादी मे न्यायालयास नम्रतापुर्वक कळवितात ते येणेप्रमाणे :

१ फिर्यादी वरील पत्यावर राहण्यास असून कायद्याचे पालन करणारा भारतीय नागरीक आहे. फिर्यादी सी - ४ / १३०१, पुण्योदय पार्क, आधारवाडी, डॉन बास्को शाळेजवळ, कल्याण (प) जि ठाणे येथे राहतो. फिर्यादी मे एसेट रिॲलिटी

या भागीदारी संस्थेचा एक भागीदार असून सामनेवाले हे पुर्वीचा भागीदार आहे. सामनेवाले दिनांक १६ मार्च २०१७ रोजी भागीदारी संस्थेमधून निवृत्त झाले आहे व तसा दस्त करण्यात आलेला आहे.

२ फिर्यादी याची वैयक्तीक मालकीची मौजे सोनिवली, ता अंबरनाथ, जि ठाणे येथील गट नं १२, हिस्सा नं १ ही जमीन मिळकत होती . सदर मिळकत फिर्यादी याने दिनांक १० डिसेंबर २०१५ रोजीच्या खरेदीखताने विकत घेतली आहे. सदर खरेदीखत झाल्यानंतर सदर मिळकतीचा सात बारा उतारा फिर्यादी याचे नावावर हस्तांतरीत झालेला आहे. सदर मिळकत फिर्यादी विकसीत करू पाहत होता. सामनेवाले हे फिर्यादीचे ईमारतीमध्ये राहतो व सामनेवाला नं १ फिर्यादीचा मित्र होता . सामनेवाला यास जेव्हा समजले की फिर्यादी त्याची जागा विकसीत करण्याच्या बेतात आहे तेव्हा त्याने फिर्यादीला भागीदारीमध्ये सदर मिळकत विकसीत करण्याचा व त्याकामी जवळ जवळ रक्कम रू २०,००,०००/- भागीदारी रक्कम म्हणून गुंतवण्याचा प्रस्ताव दिला. सामनेवाला हा फिर्यादीचा मित्र असल्यामुळे जास्त विचार न करता फिर्यादीने त्याचा प्रस्ताव स्विकारला व दिनांक १६ मार्च २०१६ रोजी फिर्यादी, त्याची आई व सामनेवाले यांचेमध्ये भागीदारीचा करार करण्यात आला. सदर करार करते वेळी फिर्यादीने सामनेवाला यास सदर भागीदारी पत्र नोंदणी करून घेण्यास सांगितले असता सामनेवाल्यांनी सदर व्यवसाय नवीन आहे व आपण नंतर भागीदारी संस्था नोंदणी करून घेऊ असे सांगितले

३ फिर्यादीचे असे म्हणणे आहे की सामनेवाले भागीदारी व्यवसायामध्ये आल्यावर सामनेवाले भागीदारी व्यवसायात विश्वासाने वागत नव्हते व ते नेहमी भागीदारांना न सांगता व्यवहार करत होता व पकडले गेल्यावर माफी मागून वेळ निभावून घेत होता सामनेवाला नं १ हा भागीदारी संस्थेच्या विक्री विभागात असलेल्या कर्मचारी व प्रस्तावित खरेदीदारांसोबत निट वागत नव्हता व त्यामुळे संस्थेचे प्रस्तावित ग्राहक नाराज होवून निघून जात होते व फिर्यादीच्या विक्री विभागास सदनिका

विक्री साठी नवीन ग्राहक शोधावे लागत होते. विक्री विभागातील कर्मचा-यांना त्यामुळे जास्तीची मेहनत करावी लागत होती. सामनेवाला यांच्या अशा वागण्यामुळे सर्व भागीदार व निवेशक नाराज झाले होते व त्यांना तो नको होता म्हणून संस्थेच्या भागीदारांची व निवेशकांची सभा घेण्यात आली व सदर सभेमध्ये सामनेवाले याने सदर भागीदारीसंस्थेतुन निवृत्त होण्यासाठी मिळकतीवरील बांधकामातील दोन रो हाऊस व चार सदनिका त्याच्या नावावर करून देण्याची अट घातली . सदर दोन रो हाऊस व चार सदनिका यांची किंमत जवळपास पावणेदोन कोटी होत होती. सदरचा निर्णय हा संस्थेचा व संस्था प्रवर्तीत करीत असलेल्या सदनिका व रो हाऊस खरेदीदारांचा विचार करून सामनेवाले हे भागीदारी संस्थेतुन निवृत्त झाल्यास पुढील भविष्यात संस्थेचा फायदाच होईल या उद्देशाने सामनेवाला यास दोन रो हाऊस व चार सदनिका देण्याचे नक्की केले परंतु एक अट घातली की सामनेवाला याने सदर भागीदारी सस्था नोदंणीकरीता तसेच त्यांना निवृत्त करण्याकरीता लागणा-या जरूर त्या अर्जावर त्यांनी सही द्यावी सदर सभेध्ये सामनेवाले यांनी सदर बाबतीत होकार दिला. सभेमध्ये ठरल्याप्रमाणे सामनेवाले यांचे नावे करारनामा करण्यास फिर्यादीने त्याचे वकीलांना कळविले व त्याप्रमाणे फिर्यादीचे वकीलांनी करार नामा बनवून दिला व नंतर सदर करारनामा व भागीदारी संस्था नोंदणी व त्याचे निवृत्तीचे अर्ज सामनेवाले यांस सहीसाठी दिले . सामनेवाला यांनी भागीदारी संस्था नोंदणी अर्जावर सही दिली परंतु मराठी भाषांतरावर सही देण्यास नकार दिला व सांगितले की दोन रो हाऊस व चार सदनिका त्याचे नावावर झाल्यावर देईन. म्हणून फिर्यादीने वकीलांकडून येत्या दहा पंधरा दिवसांत कागदपत्रे तयार करून घेतो असे संगितले असता सामनेवाला याने ठरलेल्या समझोत्याची शाश्वती म्हणून काही सुरक्षा देण्यास सांगितले म्हणून सामनेवाले यास सुरक्षा ठेव म्हणून पुढील तारखेचे तिन धनादेश देण्याचे नक्की झाले व सदर धनादेश करारनामा नोंदणीकृत करतांना परत देण्याचे ठरले म्हणून फिर्यादने त्याच्या भागीदारी संस्थेच्या आयसीआयसीआय बँक खात्याचे तिन धनादेश क्रमांक 000१४९, 000१५0 व 000१५१ प्रत्येकी रक्कम रू ६,६१,000/- चे पुढील तारखेचे सुरक्षा ठेव म्हणून दिले.

४ फिर्यादीचे असे म्हणणे आहे की दोन रो हाऊस व चार सदनिकेबाबतचा सामनेवाला नं १ याचे नावाचा कारारनामा तयार करून घेतल्यावर सामनेवाले यास बोलवून घेतले व त्यास नोंदणी शुल्क व ईत्यादी खर्च वकीलांकडे जमा करण्यास सांगितले परंतु तेव्हा सामनेवाना हा पलटला व बोलला की, "मला करारनामा माझ्या नावाने नको आहे कारण तसे केल्यास मला मिळकतीच्या मुल्यावर कर भराबा लागणार, म्हणून मला तु कुळमुखत्यार पत्र करून दे" म्हणून फिर्यादीने त्याच्या वकीलांकडून तावडतोप सामनेवाला याच्या नावाने कुळमुख्त्यारपत्र बनवून घेतले व सामनेवाला यास सदर दोन रो हाऊस व चार सदनिका विकण्याचे अधिकार दिले. सदर कुळमुखत्यार पत्र दिनांक १७ मार्च २०१७ रोजी अनुक्रमांक २७२९ वर उल्हासनगर येथील दुय्यम निबंधक - २ यांचे कार्यालयात नोंदवून दिले. कुळमुख्त्यार पत्र नोंदवून दिल्या नंतर फिर्यादीने सदर तिन्ही सूरक्षा ठेव म्हणून दिलेले धनादेश परत मागीतले असता सामनेवाले असे बोलले की, "सदर सुरक्षा ठेव धनादेश हे घरी कपाटात ठेवले आहेत व घरी पहोचल्यावर परत देतो" तेव्हा फिर्यादी यांने सामनेवाले यांस भागीदारीतुन निवृत्त होण्याचा दस्त दिला असता सामनेवाले यांनी सही दिली परंतु पुन्हा एकदा मराठी भाषांतरावर सही देण्यास नकार दिला व त्यामुळे भागीदारी संस्था नोंदणीचे व सामनेवाला याची सदर भागीदारी संसथेमधून निवृत्तीची नोंदणी झालेली नाही.

५ फिर्यादी व सामनेवाले हे कल्याणला परत आल्यावर फिर्यादी सामनेवाल्याचे घरी सुरक्षा ठेव म्हणून दिलेले धनादेश परत घ्यायला गेला तेव्हा सामनेवाले भेटले परंतु त्यांनी सदर सुरक्षा ठेव धनादेश परत देण्यास नकार दिला व बोलले की, "आम्ही तुझ्याकडून कुळमुख्यारपत्र नोंदवून घेतले आहे व आम्हाला सदर दोन रो हाऊस व चार सदनिका विकता येणार आहेत, त्यामुळे तु आमच्या कचाट्यात सापडला आहे. आता आम्ही सदर धनादेश भरून मनमानी रक्कम व तारीख टाकुन आम्ही वटण्यासाठी टाकणार आहे, व ते न वटल्यास तुझ्यावर व तुझ्या भागीदारी संस्थेवर परक्राम्य लेख कायद्याप्रमाणे न्यायालयात तक्रार करून तुला तुरुंगात टाकु" अशी धमकी दिली व मला हाकलून लावले. सदर धमकी ऐकुन फिर्यादीने

तावडतोब त्याच्या बॅंकेस सदर सुरक्षा ठेव धनादेशाचे वटविणे थांबिविण्यास नोंद करून ठेवली.

६ फिर्यादीचे असे म्हणणे आहे की सदर तिन्ही धनादेश हे सुरक्षा ठेव म्हणून सामनेवाले यांचेकडे देण्यात आले होते व सदर सुरक्षा ठेव धनादेश हे सामनेवाले याचे नावावर कुळमुखत्यार पत्र करून दिल्यानंतर परत करावयाचे होते परंतु सामनेवाले यानी विश्वासाचा भंग केला व फिर्यादीकडून सदर दोन रो हाऊस व चार सदनिकेचे कुळमुखत्यारपत्र करून घेतले परंतु सदर सुरक्षा ठेव धनादेश परत करण्यास नकार दिला आहे, म्हणून सामनेवाले याने फिर्यादीचा दंडात्मक विश्वासघात केला आहे.

फिर्यादीचे असे म्हणणे आहे की सामनेवाले यानी त्यांचे धमकी प्रमाणे तिन धनादेशापैकी पहीला धनादेश यांनी वटविण्यासाठी त्याचे बॅंकेत टाकला. परतु फिर्यादीने सदर तिन्ही धनादेशाबावत बॅंकेस न वटविण्याचे निवेदन दिले असल्याकारणाने फिर्यादीच्या बॅंकेने सदर धनादेश न वटविता सामनेवाले यास परत केला आहे. सदर धनादेश फिर्यादीच्या खात्यात वटविण्यासाठी आल्यावर सदर बाब फिर्यादीच्या लक्षात आली.

८ फिर्यादीचे असे म्हणणे आहे की सामनेवाला याने दिनांक २४ मे २०१७ रोजी फिर्यादी यांस परक्राम्य लेख कायदा कलम १३८ प्रमाणे नोटीस दिली व सदर नोटीस मिळाल्यावर फिर्यादीने सदर नोटीसीस वरीलप्रमाणे खरी परिस्थितीचे वर्णन करून त्याच्या वकीलामार्फत जबाब दिला व दिनांक २३ जुन २०१७ रोजी नोटीस देवून पुन्हा एकदा सदर तिन सुरक्षा ठेव धनादेश परत करण्यास सांगितले. परंतु सामनेवाला यास नोटीस जबाब मिळून देखील सामनेवाला याने सदर तिन्ही धनादेश फिर्यादी यांस परत केले नाही उलट सामनेवाला याने तिन धनादेशापैकी दुसरा धनादेश वटविण्यासाठी टाकला. सदर धनादेश सुध्दा न वटविता फिर्यादीच्या बॅंकेने सामनेवाला यास "जारी करत्याने वटविण्यास बंदी केली आहे" असे कारण देवून परत दिला आहे.

आयुक्त सो, कल्याण (प) यांस दिनांक १७ जुलै २०१७ रोजी लेखी तक्रार दिलेल आहे. तसेच खडकपाडा पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्यास गेला असता सद पोलीस स्टेशन येथील अधिका-यांनी सदर तक्रार घेण्यास नकार दिलेला आ म्हणून सदर तक्रार दिनांक १८ जुलै २०१७ रोजी नोंदणीकृत डाकेने पाठविण्या आलेली आहे. सदर तक्रार मिळूनन देखील पोलीसांनी फिर्यादीस काहीच कळविल नाही म्हणून दिनांक २२ जुलै २०१७ रोजी फिर्यादी स्वतः सहायक्ष पोलीस आयुक्त यांचे कार्यालात गेला असता सदर तक्रार ही खडकपाडा पोलीस स्टेशन येथे वग करण्यात आलेली आहे असे तोंडी सांगितले म्हणून फिर्यादी हा खडकपाडा पोलीस स्टेशन येथे गेला परंतु सदर ठिकाणी सुध्दा फिर्यादी यांस सांगण्यात आले की "तु आमचे वरीष्ठांकडे तक्रार दिलेली आहे तेव्हा तु त्यांनाच भेट, आम्ही काही करणार नाही" असे सांगून खडकपाडा पोलींसानी सदर तक्रारीवर योग्य ती कार्यवाही करण्यास नकार दिलेला आहे. म्हणून फिर्यादीस अखेर सदर तक्रार मे न्यायालयात दाखल करावी लागत आहे.

१३ सदर सर्व अपाराध हे मे न्यायालयाच्या स्थळ सिमेंत आधारवाडी, डॉन बोस्को शाळे जवळ कल्याण येथे खडकपाडा पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये घडलेले आहे व सदर बाबतील खडकपाडा पोलीस स्टेशन यांस आदेश देण्याचा मे न्यायालयास अधिकार आहे. सामनेवाले सुध्दा मे न्यायालयाच्या स्थळ सिमेत राहतात.

१४ सदर सामनेवाला यांचे अपराधांना तिन वर्षा पेक्षा जास्त शिक्षा असल्याकारणाने सदर तक्रार मुदतीत दाखल करीत आहे.

१५ फिर्यादी याने सदर तक्रारीसोबत जरूर ते दस्तावेज दाखल केलेले आहेत व जरूर पडल्यास आणखी दस्त दाखल करण्यास परवानगी मागत आहेत

आयुक्त सो, कल्याण (प) यांस दिनांक १७ जुलै २०१७ रोजी लेखी तक्रार दिलेली आहे. तसेच खडकपाडा पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्यास गेला असता सदर पोलीस स्टेशन येथील अधिका-यांनी सदर तक्रार घेण्यास नकार दिलेला आहे म्हणून सदर तक्रार दिनांक १८ जुलै २०१७ रोजी नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात आलेली आहे. सदर तक्रार मिळूलन देखील पोलीसांनी फिर्यादीस काहीच कळविले नाही म्हणून दिनांक २२ जुलै २०१७ रोजी फिर्यादी स्वतः सहायक्या पोलीस आयुक्त यांचे कार्यालात गेला असता सदर तक्रार ही खडकपाडा पोलीस स्टेशन येथे वर्ग करण्यात आलेली आहे असे तोंडी सांगितले म्हणून फिर्यादी हा खडकपाडा पोलीस स्टेशन येथे गेला परंतु सदर ठिकाणी सुध्दा फिर्यादी यांस सांगण्यात आले की "तु आमचे वरीष्ठांकडे तक्रार दिलेली आहे तेव्हा तु त्यांनाच भेट, आम्ही काही करणार नाही" असे सांगून खडकपाडा पोलींसानी सदर तक्रारीवर योग्य ती कार्यवाही करण्यास नकार दिलेला आहे. म्हणून फिर्यादीस अखेर सदर तक्रार मे न्यायालयात दाखल करावी लागत आहे.

१३ सदर सर्व अपाराध हे मे न्यायालयाच्या स्थळ सिमेंत आधारवाडी, डॉन बोस्को शाळे जवळ कल्याण येथे खडकपाडा पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये घडलेले आहे व सदर बाबतील खडकपाडा पोलीस स्टेशन यांस आदेश देण्याचा मे न्यायालयास अधिकार आहे. सामनेवाले सुध्दा मे न्यायालयाच्या स्थळ सिमेत राहतात.

१४ सदर सामनेवाला यांचे अपराधांना तिन वर्षा पेक्षा जास्त शिक्षा असल्याकारणाने सदर तक्रार मुदतीत दाखल करीत आहे.

१५ फिर्यादी याने सदर तक्रारीसोवत जरूर ते दस्तावेज दाखल केलेले आहेत व जरूर पडल्यास आणखी दस्त दाखल करण्यास परवानगी मागत आहेत

१६ तरी मे न्यायालयास विनंती की वरील अपराधांची चौकशी फौजदार प्रकीया संहीता कलम १५६ (३) करण्यास खडकपाडा पोलीस स्टेशन यांस निर्देशीत करावे व / किंवा सामनेवाले यांचेवर सदर तकारी प्रमाणे प्रोसेस काढण्यात यावे .

फिर्यादी

पडताळणी

मी श्री रितेश विरेंद्र मिश्रा, वय ३५ वर्षे, धंदा व्यवसाय, राहणार सी - ४ / १३०१, पुण्योदय पार्क, आधारवाडी, डॉन बास्को शाळेजवळ, कल्याण (प) जि ठाणे, सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील प्रमाणे मजुकर माझे माहीती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असून त्याचे साक्ष करीता आज दिनांक २७ जुलै २०१७ रोजी सही केली आहे .

फिर्यादी

को दा ता 27/7/2017

फिर्यादीतर्फे वकील

Order below Exh.1 in O.M.A. No.360/2017

Hard learned advocate at length. Perused the complaint and documents annexed with it. It seems that the allegations are in respect of using three cheques which were given for security purpose. It was decided to return the said cheques at the time of agreement. But the accused without returning those cheques after agreement deposited for encashment. However, those cheques bounced as he had instructed to his bank. The entire allegations seems to be depend on documentary evidence. The investigation at the hands of police as contemplated is not necessary. Hence the complaint is treated under section 200 of the Code of Criminal Procedure and the complainant is fixed for recording verification statement of the complainant.

Kalyan.
Date : 06/02/2018.

(Vijay P. Kedar)
Judicial Magistrate F.C.,
1st Court, Kalyan.

ORDER BELOW EXH.1 IN O.M.A. NO. 360/2017

- Read complaint and verification.
- Perused documents on record.
- Heard Ld. Counsel for the complainant at length.
- Taking into consideration alleged facts and nature of the offence, Sr. P. I. of Khadakpada Pol. Stn. is hereby directed to make inquiry and submits his detailed report u/s.202 of Code of Criminal Procedure.

13.7.18.

Date : 13/07/2018.
Kalyan.

(Prajakta N. Dhane)
J.M.F.C., 1st Court, Kalyan.

सत्य-प्रत

सहाय्यक अधिक्षक
पहिले न्यायालय, कल्याण.
5 APR 2019

छायांकित व
तुलनाब करणार
5 APR 2019